# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ)

**(क्रिडा व शारिरिक शिक्षण विभाग)**

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

जावक क्रमांक/गो.वि.ग./क्रि.शा.शि.वि./ 81 /२०२२ दिनांक : ०१/०२/२०२२

प्रति,

मा. प्राचार्य / विभाग प्रमुख
सर्व संलग्नीत महाविद्यालये व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय : - शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे क्रिडा व कला महोत्सवाकरीता नोंदणी करण्याबाबत..**

संदर्भ : - प्र-कुलगुरू कार्यालयाचे पत्र क्र. गों.वि.ग./प्र-कुल.का./२४२/२०२२, दि. २९/०१/२०२२

महोदय,

मा. कुलगुरू महोदयांच्या मान्यतेनुसार गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीशी संलग्नित महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकरीता दोन दिवसीय **क्रिडा व कला महोत्सव** दि. २६ व २७ फेब्रुवारी, २०२२ रोजी नियोजीत केलेले आहे.

शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमधील कलागुणांना वाव मिळून त्यांच्यामध्ये खेळांप्रती उत्साह निर्माण व्हावा याकरीता आयोजीत क्रिडा व कला प्रकारामध्ये बहुसंख्य कर्मचारी सहभागी होतील याकरीता प्राचार्यांनी कर्मचाऱ्यांना सरावाकरीता मैदान, आवश्यक खेळांचे साहित्य उपलब्ध करून द्यावे व कर्मचाऱ्यांना खेळात सहभाग घेण्याकरीता प्रोत्साहीत करावे.

क्रिडा व कला महोत्सवाकरीता खालीलप्रमाणे खेळ व कला प्रकार नियोजीत असून सहभाग घेवू ईच्छिणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी महाविद्यालयांच्या लेटरहेडवर प्राचार्यांच्या स्वाक्षरीने दिनांक १०/०२/२०२२ पर्यंत क्रिडा व शा. शिक्षण विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचेकडे टपाल/ई-मेल व्दारे नोंदणी करावी.

Email - gug.registrar@gmail.com
directorsportsgondwanauni@gmail.com

**१) खेळांचे प्रकार –**

**(१)** क्रिकेट (पु.) **(२)** व्हॉलिबॉल (पु.) **(३)** दौडस्पर्धा / फास्ट वॉकींग (म. व पु.) **(४)** रस्साखेच (म.)
**(५)** कबड्डी (पु.) **(६)** कॅरम (म. व पु.) **(७)** बुद्धीबळ (म. व पु.) **(८)** चमचा गोळी (म.) **(९)** संगीत खुर्ची (म.)

**२) कला प्रकार (सांस्कृतीक कार्यक्रम) –**

**(१)** समुह/एकल गितगायण (म. व पु.) **(२)** समुह/एकल नृत्य (म.व पु.) **(३)** नाटीका (म. व पु.)
**(४)** मिमिक्री इत्यादी (म.व पु)

मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये

01/02/2022

**डॉ. अनिता एम. लोखंडे**
संचालक, क्रिडा व शा. शिक्षण विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी –

१) मा. कुलगुरू यांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३) मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली